## —: प्रेसनोट :—  दिनांक :— १५/१२/२०२०

यातील फिर्यादी यांचे विरुध्द दाखल गुन्हयातील जप्त मोबाईल देण्याकरीता तसेच सदर गुन्हयांत फिर्यादी यांचे वडीलांचे नांव समाविष्ठ न करण्याकरीता यातील आलोसे यांनी रु. ४०,०००/— व एक दारुची बाटली अशी मागणी करुन पडताळणी/सापळा कारवाईदरम्यान तडजोडीअंती रु. २०,०००/— ची लाच स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २४/२०२० |
| कलम | कलम — ७, १२ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपी इसम | १) भारत शिवाजी ढेंबरे, वय ३९ वर्षे, पोलीस उप निरीक्षक, चारकोप पोलीस ठाणे, मुंबई<br>२) खाजगी इसम |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये ४०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडीअंती रुपये २०,०००/— |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी यांच्या कंपनीला बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन क्लिनअप मार्शलचे कंत्राट मिळालेले आहे. नमुद कंपनीमार्फत विना मास्क आढळुन आलेल्या इसमांवर कारवाई करुन दंड आकारणीचे काम कंपनीचे कर्मचाऱ्यांमार्फत केले जाते.<br><br>सदर कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी महावीर नगर, कांदिवली पश्चिम परिसरातील एका व्यक्तीवर केलेल्या कारवाईचा राग मनात ठेवुन त्या व्यक्तीच्या नातेवाईकाने व त्याच्या सहकाऱ्यांनी फिर्यादी यांच्या घरी येवुन फिर्यादी यांना दमदाटी केली. सदरवेळी नमुद व्यक्ती व फिर्यादी तसेच त्यांचा भाऊ यांचेत दिनांक ११ व १२/१२/२०२० रोजी वादविवाद होवून मारामारी झाली. त्यामध्ये त्या व्यक्तीच्या डोक्याला मार लागून रक्तस्त्राव झाला त्यामुळे फिर्यादी व त्यांचे दोन भाऊ व इतर यांचे विरोधात चारकोप पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला.<br><br>सदर गुन्हयात फिर्यादी व त्यांचे दोन भाऊ यांना अटक करुन तिघांचे मोबाईल तसेच फिर्यादी यांचे घरातील सीसीटीव्ही फुटेजचा डिव्हीआर जप्त करण्यात आला. फिर्यादी व त्यांचे भावांना जामीन मंजुर झाल्यानंतर फिर्यादी हे चारकोप पोलीस ठाणे येथे जामीन देण्याकरीता आले. त्यावेळी लोकसेवक मिळुन न आल्याने तेथील उपस्थित पोलीस अंमलदारांकडे फिर्यादी यांनी त्यांचे जप्त मोबाईल व डीव्हीआर संबधात चौकशी केली. त्यावेळी नमुद पोलीस अंमलदारांने लोकसेवकाशी मोबाईलवर संपर्क साधला असता लोकसेवकाने नमुद मोबाईल गुन्हयाच्या तपासकामी जप्त केले असुन ते कोर्टातुन सोडवुन घ्यावे असे फिर्यादीस सांगितले.<br><br>त्यानंतर फिर्यादी यांनी लोकसेवकाच्या परिचयाचे खाजगी इसमाची भेट घेवुन त्यांचे जप्त मोबाईल व डिव्हीआरबाबत माहिती दिली. सदर खाजगी इसमाने लोकसेवक यांना संपर्क साधला असता, लोकसेवक यांनी जप्त केलेले मोबाईल परत देणेकामी रोख रक्कम रु. २०,०००/— तसेच सदर गुन्हयात फिर्यादी यांच्या वडीलांचे नांव समाविष्ठ न करण्याकरीता रोख रु. २०,०००/— असे एकुण रु. ४०,०००/— व एक ब्लेन्डर प्राईड दारुची बाटली अशा लाचेची मागणी करुन दिनांक १४/१२/२०२० रोजी फिर्यादीस पोलीस ठाणे येथे त्यांची भेट घेण्यास सांगितले.<br><br>फिर्यादी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि.कार्यालयात समक्ष येवुन लोकसेवकाविरुध्द तक्रार केली. त्यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक पोलीस उप निरीक्षक भारत शिवाजी ढेंबरे यांनी लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रोख रक्कम रु. २०,०००/— ची लाच स्विकारल्याने रंगेहाथ पकडण्यात आले. |

अपर पोलीस उप-आयुक्त सत्यमेव जयते बृहन्मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

15/12/20

( रमेश धुमाळ )
अपर पोलीस उप आयुक्त (१),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.

| | |
|---|---|
| टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२,<br>फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,<br>वेबसाईट—acbmaharashtra.gov.in,<br>ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in, | ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,<br>फेसबुक www.facebook.com - Maharashtra ACB.<br>मोबाईलॲप www.acbmaharashtra.net |